المطوية :- الدعوة الى الله

الكاتب :- محمد فاروق ہرزک

مراجعه وتصحيح :- دكتور سفيان قاضى المدنى

# आमंत्रण अल्लाहकडे देणे

लेखक

मोहम्मद फारुक हुर्ज़ूक

संदर्भ

ड़ॉ सुफ्यान काझी

सन:- २०२५

बिस्मिल्लाहीर्राहमानिर्राहीम

अल्लाहच्या नावाने आरंभ करतो जो अत्यंत दयाळू व कृपाळू आहे.

या पत्रिकेच्या अंतर्गत "आमंत्रण अल्लाहकडे देणे" याचा अर्थ व खुलासा आणि याचे महत्व स्पष्ट करण्यात आले आहे, जे इस्लामिक मार्गानुसार कुरआण व प्रेषित मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) चे कथन (हदीस) च्या संर्भात प्रकाशित आहे.

अल्लाहच्या दृष्टीने मनुष्य हा सर्वोत्म प्राणी आहे जो चांगल्या कर्मांसाठी उत्सुक असतो व वाईट कर्मांपासून स्वत: व दुसऱ्यांना वाचविण्याचे प्रयत्न कडतो आणि इतरांनाही आज्ञा देतो.अल्लाहच्या नजरेत हा सर्वोत्म स्वभाव आहे. तेव्हा प्रत्येक व्यक्तीला आपल्या उत्कृष्ट कर्माकडे आकर्षित व्हायला पाहिजे, मला अल्लाहपाशी आशा आहे की या पत्रिकेच्या संदर्भात आपण व आपल्या परीवारकडे चांगले कर्म करण्यासाठी कळजीपूर्वक लक्ष द्याल.

अल्लाहने या पृथ्वीवर मानवाला सर्वोत्म बुध्दी देऊन चांगल्या समाजाच्या रुपात वसविले आणि मानवाने या समाजाला सुसंस्कृत केले किंवा आपल्या बुध्दीचा वापर ना करता वाईट कृतीनी दूषित केले, म्हणून समाजात मानवी सुधार करण्यासाठी अल्लाहने संदेष्टा आणि संदेशवाहकांची सुरवात केली, ज्याचा उद्देश समाजात राहणाऱ्या सर्व लोकांना त्यांच्या पालनकर्त्या सत्य मॉबूदा (सत्य ईश्वरा) ची ओळख करुन देणे आणि त्या सत्य मॉबूद (अल्लाह) ची उपासना करण्यासाठी आमंत्रित करणे, समाजात अमन व शांती प्रस्थापित करणे, समाज सुधारणेचा आणि चांगले होण्याचा खरा पुरावा सादर आहे. त्या सर्व प्रेषितांचे शेवटची कडी मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) च्या विषयी कुरआण मध्ये अल्लाहने असे वर्णन केले आहे.

[" तोच (अल्लाह) आहे ज्याने निरक्षर लोकांमध्ये त्यांच्या मधूनच एक प्रेषित पाठविला. जो त्यांना (अल्लाहचे) श्लोक वाचून ऐकवितो आणि त्यांचे (हृदय) शुद्ध करतो आणि त्यांना ग्रंथ व ज्ञान शिकवितो. नि: संशय ते या पूर्वी स्पष्ट अशा मार्गभ्रष्टतेत होते."](कुरआण- ६२:२)

अल्लाहकडे आमंत्रण देण्याचा उद्दिष्ट्य शेवटचे पैगम्बरावर संपले. आणि त्यांच्या नंतर हे उद्दिष्ट्य, त्यांचे अनुयायींवर ठेवले ज्याचा उल्लेख कुरआणमध्ये अल्लाहने असे वर्णन केला आहे.

[" तुम्ही (पैगम्बरांचे अनुयायी) एक सर्वोत्म जनसमुह आहात, ज्यांना मानवजातीच्या कल्याणासाठी घडवून पुढे आणण्यात आले आहे. तुम्ही (लोकांना) सत्कर्माची शिकवण देता आणि त्यांना दुष्कृत करण्यास मनाई करता आणि तुम्ही अल्लाहवर श्रध्दा ठेवता......."] (कुरआण- 3: 110)

आमंत्रण अल्लाहकडे देणे म्हणजेच इस्लाम धर्माचे प्रचार व प्रसार नव्हे तर मानवी जीवनामध्ये त्यांचे शत्रू अनेक प्रकारचे आहेत त्या शत्रूंपासून लोकांना सावध करणे, मृत्यूनंतर च्या संकटातून वाचवणे, आणि मानवतेचा निर्माता व पालकर्ता अल्लाहची ओळख करुन देणे, अल्लाहतर्फे सदैव सुखदाई मार्गाकडे मार्गदर्शण करणे अत्यंत गरजेचे आहे. कारण अल्लाहकडे आमंत्रण देणे म्हणजेच मानवी, मानवतेचा आणि इतरांच्या चांगुलपणाचा व करुणेचा स्पष्ट पुरावा आहे.

अल्लाहकडे आमंत्रित करण्याचा उद्देश म्हणजे मानव जातीची निर्मिती पूर्ण करणे आणि अविशवासुंना अविशवास व मार्गभ्रष्टतेच्या अंधारातून बाहेर काढून खऱ्या मार्गदर्शनाच्या प्रकाशाकडे आणणे होय जसा की कुरआण मध्ये असा उल्लेख झाला आहे.

[" हा ग्रंथ आम्ही (अल्लाहने) तुमच्याकडे अवतरीत केला आहे, यासाठी की तुम्ही (पैगम्बर /अनुयायी) लोकांना अंधारातून प्रकाशाकडे आणावे त्यांच्या पालनकर्त्याच्या आदेशाने जो सर्व शक्तीमान अल्लाहकडे जातो.:(कुरआण-१४:१)

इस्लाम धर्मानुसार " अंधारातून प्रकाशाकडे आणणे "म्हणजे अज्ञान, पाप, अन्याय, आणि शिर्क (अनेकेश्वावरवाद), नर्काच्या अग्नीपासून वाचवून सत्य ज्ञान व श्रध्दा, (इमान/विश्वास), तौहीद, एकेश्वरवाद- अल्लाहच्या सत्य मार्गाकडे मार्गदर्शण करणे. मानवतेचा शत्रू आणि त्यांचा पालनकरता अल्लाह विषयी कुरआण मध्ये असा उल्लेख झाला आहे.

[" धर्माच्या बाबतीत कोणतीही जबरदस्ती नाही. सदाचरणी मार्ग आणि दुराचरणी मार्ग यातील फरक आता स्पष्ट झालेला आहे. तर जो कोणी सैतानी मार्गदर्शनाचा धिकार कडतो आणि अल्लाहवर विश्वास ठेवतो त्याने निश्चितपणे एक मजबूत आधार पकडून ठेवला. तो कधिही तुटू शकणार नाही. अल्लाहवर विश्वास ठेवणाऱ्या लोकांचा आश्रयदाता आहे. तो त्यांना अंधकारातून बाहेर काढून प्रकाशाकडे आणतो. आणि अविश्वासुंचा मित्र सैतान आहे. तो त्यांना प्रकाशातून बाहेर काढून अंधकाराकडे घेऊन जातो. त्यांचे नरकाच्या आगीत जाणे अटळ आहे. ते त्यात सदैव राहतील. (कुरआण- २:२५६ , २५७) अल्लाहने कुरआण प्रकट करण्याचा उद्देश असा नमूद केला आहे.

[" हा कुरआण, समस्त लोकांकरीता सुचनापात्र आहे की याव्दारे लोकांना सचेत केले जावे

आणि त्यांनी (लोकांनी) पूर्णपणे हे जाणून घ्यावे की अल्लाह एकमेव उपासनेस (भक्तीसाठी) पात्र आहे. आणि यासाठी की बुद्धिमान लोकांनी विचार चिंतन करावे."] (कुरआण-१४:५२)

पैगम्बर मुहम्मद (स.अ.व स.) यांनी शेवटचे हज्जच्या दिवशी सांगितले.

{" जे लोक आजच्या दिवशी हाजर आहात त्यांनी दुसऱ्या लोकांपर्यंत इस्लाम धर्माचे आदेश पोहचवावा."/ म्हणजे ही जबाबदारी पूर्ण करा } (मुसंद अहमद /३३६)

प्रेषित मुहम्मद (स.अ.व) ने दुसऱ्या वेळी असे सांगितले.

{" माझ्याकडून (इतर लोकांना इस्लामचा) आदेश पोहचवा जरी तो फक्त एकच श्लोक असेना."} ( सहीह- बुखारी :३४६१)

खरोखर ! कुरआण व हदीस हे मानवाच्या हृदयाचे शुद्धिकरण करते जेणेकडून समाजातील लोकांच्या सुधारण्यासाठी सर्वोत्म आणि सोप मार्ग आहे. आणि त्यांच्या शत्रूंपासून सावधानतेचा मार्ग दाखवून देतो. तसेच या जगात प्रत्येक व्यक्तीने पवित्र व्हावे. आणि त्यांच्या हृदयात पालनकर्ता अल्लाहकडे वळण्याची इच्छा व क्षमता निर्माण व्हावी. यासत्व अल्लाह आपल्या दासांना मृत्यूनंतर जीवनात सुखदाई स्वर्गाची हामी देतो.

म्हणून अल्लाहचे प्रेषित मुहम्मद ( सल्लल्लाहु अलैहि व सल्लम ) म्हणाले {"(इस्लाम) धर्म हा हिताची व सद्भावनाच्या (शिकवणीचा) नाव आहे."} (सहीह मुस्लिम- १८३)

अर्थात इस्लाम धर्म, कुरआण आणि प्रेषित मुहम्मद (स.अ.व सल्लम) लोकांच्या विषयी हितचिंतक आहेत हे सिध्द झाले. धर्म म्हणजे एकमेकांची भलाई व चांगल्या कर्मा बाबत मदत करण्याची भावना आहे. जस की अल्लाहने कुरआण मध्ये स्पष्ट आदेश दिला आहे.

["...... सदाचरनी आणि धर्मनिष्टेच्या बाबतीत एकमेकांना मदत करा. आणि दुराचारी आणि अत्याचार बाबतीत एकमेकांना मदत करु नका. आणि (आपल्या हृदयात) अल्लाहचे भय बाळगा निश्चितच अल्लाह शिक्षा देण्याच्या बाबतीत फार कठोर आहे.(कुरआण- ५ : २)

तेव्हा लक्षात ठेवा "अल्लाह " कोणत्याही जनसमुहावर अत्यचार करीत नाही पण लोक आपल्या दुष्कृत्यनुसार स्वत: वर अत्यचार करुन घेतात." जस की कुरआण मध्ये अल्लाहने असे वर्णन केले आहे.

[" ज्यांनी अविश्वास दाखवला आणि अल्लाहच्या मार्गात (लोकांना) अडथळे निर्माण केले आम्ही त्यांना शिक्षावर शिक्षा वाढवित जाऊ हा बदला असेल त्यांच्या दुष्कृत्यांचा."] (कुरआण- १६: ८८)

अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) म्हणाले { "....... गर्व आणि अहंकार म्हणजे एखादी व्यक्ती सत्याचा विपर्यास करते आणि लोकांना तुच्छतेने पाहते ."} (सहीह- मुस्लिम-९१)

अललाहने प्रत्येक व्यक्तीला पाहण्यासाठी डोळे, ऐकण्यासाठी कान, खरे व खोटे ठरविण्यासाठी हृदय व उत्कृष्ट बुद्धी दिली आहे. परंतु बहुसंख्य लोकांच्या डोल्यांनी, कानानी आणि हृदयांनी व बुद्धीने त्यांना काहीच लाभ पोहचविले नाही. उल्ट, त्यांनी नेहमीच अहंकाराचा प्रदर्शन करीत इस्लाम धर्म, पैगम्बर, कुरआण आणि अल्लाहला माणण्यास नकार दिला. आणि अल्लाहकडे आमंणत्रित करणाऱ्या लोकांचे गर्वपणाणे विरोध करुन अडथळा निर्माण करतात आणि लोकांना सत्यपासून भडकटवितात. अशा लोकांना मृत्यूनंतर शिक्षा देते वेळी तहाण लागेल, तर अपमानित करण्यासाठी उकळते पाणी पेयाला दिले जाईल. आणि ते तिथे काय म्हणतील त्या बाबत कुरआण मध्ये दोन ठिकणी असे वर्णन केले आहे.

[" आणि ज्यांनी सत्य स्वीकारण्यास नकार दिला (तर त्यांना अपमानित करीत) त्या नकारापोटी पिण्यासाठी उकळते पाणी व दुखदायक शिक्षा दिले जाईल."] कुरआण- १०: ४]

[" आणि ते म्हणतील, जर आम्ही (जगातील जीवनामध्ये आमंत्रित करणाऱ्यांचे) म्हणणे ऐकले असते किंवा आमच्या बुद्धीचा खरा वापर केला असता तर नरकवासीयांपैकी झालो नसतो."] (कुरआण- ६७: १०)

बंधूनो ! सैतान मानवाचा सुरवाती पासून उघड शत्रू ठरलेलाच आहे. यात मुळीच शंका नाही तो माणसाच्या हृदयात गुप्त आवाजाने अल्लाहला नकार देण्यास प्रवृत करतो आणि असत्य रुपात अनेक प्रकारचे मॉबूद (ईश्वर / उपास्य) चे मार्ग निर्माण करुन देतो हे त्याच्या हेतूचा पहिला उद्देश आहे, जेणेकरुन लोकांची फसवणूक होते, मग तो सैतान लोकांना अन्याय, अत्याचार, आणि व्यबिचार व इतर मार्गभ्रष्टचारकडे भरकटवित असतो. आणि लोकांमध्ये मत्सर व द्वेष निर्माण करण्यासाठी नेहमीच प्रयत्न करीत असतो. म्हणून प्रेषितांनी असे सांगितले.

{"आज जे लोक उपस्थित आहेत त्यांनी अनुपस्थित असलेल्यांना ज्ञान पोहचवावे."} (सहीह बुखारी- १०४,१०५)

याचा अर्थ कुरआण व पैगम्बराचे कथने (हदीस) चा ज्ञान प्रत्येक व्यक्ती पर्यंत पोहचवणे हे त्यांच्या सद्भावनेचा सर्वात मोठा पुरावा आहे. तेव्हा सार्वजणीक लोकांशी माझ्या प्रेमळ सल्लानुसार आपल्याकडे नम्र विनंती आहे की, अल्लाहकडे आमंत्रित करणाऱ्यांचे विरोध करु नका. आणि अल्लाहतर्फे जर कोणाला इस्लाम धर्माची शिकवणीचा लाभ गाठत असेल तर त्या व्यक्तीचा ही विरोध करुन सैतानचे भगीदार बनू नका, आणि आपल्या स्वता: ला अल्लाहच्या शिक्षाचे गुन्हगार ठरवू नका. आणि या सत्य ज्ञानाचा लाभ घेऊन परलोकातील जीवनाच्या संकटातून मुक्ती मिळवण्याचे साधन प्राप्त करावे.

कारण या जगाच्या जीवनात मानवी विकासासाठी आणि मृत्यूनंतरच्या जीवनात सफल होऊन स्वर्गचे निवासी बनण्यासाठी अल्लाहची कृपा, दया आणि क्षमा, कुरआण व संदेशवाहकांचे हदीस शिवाय दुसरे कोणतेही प्रभावी साधन मानवाकडे उपलब्द नाही. म्हणून अल्लाहवर विशवास ठेवून व त्याचे भय बाळगुण कुरआण व हदीसचे अध्यान करणे प्रत्येक व्यक्तीला अनिवार्य आहे कारण हा कुरआण सार्वजणीक लोकांकरिता सुस्पष्ट आदेश व निवेदन आणि हृदयाचे शुध्दीकरण करण्याचे उत्कृष्ट ज्ञान आहे.

**धन्यवाद !**

**Thank You**

